# एक होती जेसी

अर्ध्या रात्री फोन वाजला. जेसीने तो पटकन् उचलला, कारण शेजारी झोपलेल्या डेव्हिडला जाग आली असती. त्याच्या गॅरेजमध्ये तो सबंध दिवस कष्ट करीत असतो. रात्रीची शांत झोप त्याला आवश्यकच होती. हलक्या आवाजात तिने 'हॅलो' केले. तिला माहीत होते की असा मध्यरात्री येणारा फोन इन्स्पेक्टर रॉजरचाच असणार आणि त्याच्या गावाबाहेरून जाणाऱ्या इंटर स्टेट हायवेवर ॲक्सिडेंट झाला असणार. ''रॉजर काय झालंय?''

''तू पटकन ये जेसी, रक्तस्राव फार होतोय.''

जेसीने फोन ठेवला. आवाज न करता नाईटी बदलून ड्रेस चढवला. पटकन् आपली बॅग घेतली व ती खाली आली. फाटकातच तिची वाट पाहत हवालदार जिमी उभा होता. पोलीस व्हॅन सुरू झाली. दोन मिनिटांत जेसी ॲक्सिडेंटच्या जागी पोहोचली. जेसीने इतक्या फास्ट त्याची जखम पुसून त्या पेशंटला मलमपट्टी केली. रॉजर पाहतच राहिला. ''मी फोन केलाय आताच इमर्जन्सी हेलिकॉप्टर येऊन पेशंटला हॉस्पिटलमध्ये नेईल. थँक्स यू जेसी. तू आणखी एक प्राण वाचवायचे पुण्य केले आहेस...'' रॉजर म्हणाला.

त्यावर ''त्या आकाशातल्या देवाची कृपा बरं मी चलते. माझा नवरा जागा व्हायच्या आत मला घरी पोहोचले पाहिजे.'' असे म्हणून जेसी लगबगीने व्हॅनमध्ये बसली.

जेसी हळूच दार उघडून आत आली. आवाज होऊ न देता तिने ड्रेस बदलून नाईटी चढवली व हळूच पांघरुणात शिरली. डेव्हिडने तिच्या भोवती हात टाकून तिला जवळ ओढले व म्हणाला, ''फार मोठा होता का ॲक्सिडेंट?''

''अरे तुला काय माहीत तू तर झोपला होतास!''

''असे तुला वाटते पण तुझी वाट बघून माझी झोपच उडून गेली.'' असे म्हणून त्याने तिला अधिकच जवळ ओढले.

सकाळी उठल्यावर मात्र डेव्हिड तसेच तिचा हॉस्टेलमधून सुट्टीत घरी आलेला मुलगा सॅम या दोघांनी तिला आता ही नर्सिंग कम डॉक्टरकी बंद करायचा ठाम फतवा काढला. शेवटी जेसी म्हणाली की, ''ठीक आहे. अगदीच जरूरी पडली तर जाईन, नाहीतर हे काम सोडले.''

गेले दोन दिवस जेसी घरातली कामे करण्यात मग्न होती. मुलगा आणि नवरा या दोघांनी तिला ''आता लष्कराच्या भाकऱ्या भाजणे पुरे'' अशी सक्त ताकीद दिली होती. मुलगा आईचा सहवास भरपूर मिळतो म्हणून खूश होता. पण डेव्हिड? गावातल्या प्रत्येकाने चार चार वेळा त्याला ''जेसी कुठे आहे? दिसली नाही दोन दिवसांत! बरी आहे ना...?'' अशा प्रश्नांचा भडिमार करून जेरीस आणले होते. शेवटी गॅरेज बंद करून तो घरी आला तेव्हा जेसीला म्हणाला, ''जा बाई एकदा गावातून फिरून सर्वांना दर्शन देऊन ये. आणि हो ती जॉनची बायको पोटात दुखते असे म्हणत होती. तिलाही बघून ये.''

''अरे हो! तिचे दिवस भरत आलेत. मला तिचीच काळजी होती. पटकन् जाऊन येते हं!'' असे म्हणून आपली बॅग घेऊन जेसी ज़ॉनच्या घरी धावत सुटली. डेव्हिड हसू लागला. ही जन्मात सुधारणार नाही. सगळ्या गावची आरोग्याची धुरा हिने स्वतःच्या खांद्यावर घेतली आहे ना!

पण डेव्हिड म्हणाला ते खरेच होते. त्यांचे मेलबर्न गाव कॅलिफोर्निया स्टेटच्या एका कोपऱ्यात होते. गाव शेतकऱ्यांचेच होते. अत्याधुनिक सुधारणापासून लांब! शेतात खपावे- भरपूर पिकवावे, धान्य, फळे, भाज्या ट्रकवर किंवा ट्रॅक्टरवर घालून लांब शहरात तो माल पोचवावा. घरटी एक तरी ट्रक किंवा ट्रॅक्टर असल्याने डेव्हिडच्या एकमेव गॅरेजला भरपूर काम असे. गावात कोणी डॉक्टर नव्हता की केमिस्ट नव्हता. एक सरकारी दवाखाना होता. त्यात आठवड्यातून दोन दिवस चार तासासाठी एक कुडमुड्या डॉक्टर यायचा. तो जेसीला मदत करायचा की जेसी त्याला! कोण जाणे पण तो दवाखान्यात वेगवेगळ्या औषधांचा भरपूर स्टॉक करून ठेवायचा. त्या औषधांची सर्व माहिती जेसीने करून घेतली होती. त्याच्या गैरहजेरीत जेसी दवाखाना उत्तम प्रकारे चालवायची. शिवाय बाळंतपणे व वेळ पडली तर छोटी ऑपरेशन्स करण्यात जेसी एकदम प्रवीण होती. जेसीवर लोकांचा विश्वास होता. ते तिला देव मानत. तिच्यावर माया करत. अजूनपर्यंत तरी जेसीला अपयश माहीत नव्हते.

एकदा एक पाहुणा तिठ्यावर उतरला व मेलबर्न गावाची चौकशी करत चालत चालत गावात आला. त्याला पहिली दिसली ती फंटुशची चहाची

टपरी. फंटुशने त्या पाव्हण्याची चौकशी केली. उन्हातून आल्याने तो लाल झाला होता. फंटुशला वाटले याला ताप आला आहे. त्याने त्याला चहा दिला व नंतर जेसीकडून औषध घे, म्हणजे ताप पळून जाईल असा सल्ला दिला. पाहुण्यांना तेच हवे होते. त्याने साधेपणाने जेसीची माहिती विचारली व तो दवाखान्यात गेला. त्याने डॉक्टरची चौकशी केली तर आज डॉक्टर येणार नाही असे तिथल्या नोकराने सांगितले. आपल्याला ताप आला आहे व औषध पाहिजे असे त्या पाहुण्याने सांगितले. नोकराने जेसीला बोलावून आणले. पाहुण्याचा शहरी पोशाख बघून जेसी जरा अस्वस्थ झाली. तिने त्याला काय होते असे विचारले. त्याने सांगितलेली माहिती ऐकून जेसी मनात म्हणाली, ''ही तर 'फ्लूची लक्षणे'. तिने कपाट उघडून औषधाची एक स्ट्रीप दिली व डोस सांगितला. त्याने दिलेले पैसे दवाखान्यात जमा केले. ती स्ट्रीप डॉक्टरने प्रिस्क्राइब केले तरच केमिस्टकडे मिळू शकते. प्रिस्क्रिप्शनशिवाय हे औषध कोणाला मिळू शकत नसे, पण ह्या गोष्टी जेसीला माहीत नव्हत्या. डॉक्टरांकडून तिने कुठल्या गोळ्या कुठल्या आजारात द्यायच्या, ह्याची माहिती नीट करून घेतली होती व ती त्या गोळ्यांचा योग्य तऱ्हेने उपयोग करत होती. गोळ्या डॉक्टर आणत असत. आपण त्या देणे हा गुन्हा आहे, हे तिला माहीतच नव्हते. त्यामुळे हा पाहुणा तिला जाळ्यात पकडायला आला आहे याची तिला कल्पनाच नव्हती, पण त्याचे काम झाले होते.

दुसऱ्या दिवशी तो पाहुणा आपल्या शहरात पोहोचला. त्याने त्याच्या औषधी कंपनीत ती स्ट्रीप दाखवली व हे प्रिस्क्रिप्शनशिवाय न मिळणारे औषध जेसीने, कसलीही मेडिकलची पदवी नसणाऱ्या गावठी आयाने त्याला न आलेल्या तापावर घ्यायला दिली असे सांगितले. कंपनीने मेडिकल कौन्सिलला ही हकीकत कळवून कोर्टात खटला भरायला लावला. दोनच दिवसात पकड वॉरंट दाखवून पोलीस जेसीला पकडून घेऊन गेले. स्वतःकडे डॉक्टरी पदवी नसताना तिने हे औषध देऊन मोठा गुन्हा केला होता. गावचे लोक दुःखी झाले. फंटुश तर आपणच त्या पाहुण्याला जेसीकडे पाठवले म्हणून हे सर्व झाले असा स्वतःलाच दोष लावून घेऊ लागला. गावातल्या प्रत्येक घरात जेसीमुळे आजारातून बरी झालेली, मरणाच्या दारातून परतलेली मुले, म्हातारी तरणी माणसे होती. जेसीसाठी सर्व गाव हळहळत होते... गावकऱ्यांना विचार पडला आता काय करायचे?

सुदैवाने त्याच दिवशी डेव्हिडचा एक जुना मित्र शहरातून त्याला भेटायला आला होता. त्याने सर्व घटना कशी घडली याची चौकशी केली. जेसीकडे

कसले मेडिकल सर्टिफिकेट आहे का याची विचारणा केली. डेव्हिड म्हणाला, ''नाही. तिची आई सुईणपण करत होती. तिच्याबरोबर राहून तिने सर्व गोष्टी शिकून घेतल्या. त्यात तिला ह्या कामाची आवड व हुशारी यामुळे ती रोगावर घरगुती व डॉक्टरी योग्य औषधे देतेच पण वेळ पडली तर छोटी ऑपरेशन्स पण करते. अजूनपर्यंत हिने चुकीचे औषध दिले व पेशंट दगावला असे कधीच झाले नाही. मी तिला नर्सिंगची परीक्षा दे म्हणत होतो पण इथे जवळपास तशी काहीच सोय नाही व शहरात जाऊन राहणे शक्य नाही...''

डेव्हिडचा मित्र म्हणाला, ''तिच्याकडे कसलीही मेडिकल पदवी नाही त्यामुळे तिची केस कोर्टात तिच्या बाजूने उभी राहू शकत नाही. तिला १०-१५ वर्षांची शिक्षा होईल. माझा एक मित्र हुशार वकील आहे. त्याला मी उद्या घेऊन येतो, पण त्याची फी जबर आहे.''

डेव्हिड म्हणाला, ''माझे गॅरेज मी गहाण टाकीन व पैसे उभे करीन. पण जेसी सुटलीच पाहिजे.'' ...गावातल्या लोकांना जेव्हा हे कळले तेव्हा त्या सर्वांनी आपली अडीअडचणीसाठी ठेवलेली ठेव बाहेर काढली, सर्व पैसे जमवून ते डेव्हिडकडे आणून दिले व म्हणाले, ''आमच्या प्राणापेक्षा ही रक्कम जास्त नाही. जेसी आमचा प्राण आहे.'' डेव्हिडला ते ऐकून गहिवर आला. मित्राबरोबर डेव्हिड व सॅम शहरात जेसीला भेटून धीर द्यायला गेले.

थोड्याच दिवसात केस कोर्टात उभी राहिली. सरकारी वकिलाने जोरदार शब्दात असा युक्तिवाद केला की... जेसीकडे कसलाही डॉक्टरी परवाना नसताना ती प्रिस्क्राइण्ड मेडिसिन लोकांना देत होती. लोकांवर औषधी इलाज करत होती. बाळंतपणे करत होती. हे सर्व कायद्याविरुद्ध आहे. तिच्या या बेकायदा वागण्याबद्दल तिला जास्तीत जास्त कडक शिक्षा द्यावी म्हणजे दुसरे कोणी असे करण्यास धजावणार नाही.

जेसीच्या वकिलाने कोर्टाला विचारले, ''गावात औषधोपचाराची सोय करणे सरकारचे काम आहे की नाही. मग सरकारने त्यासाठी काय केले? एक छोटासा सरकारी दवाखाना व एक कुडमुड्या डॉक्टर जो फक्त चार तासासाठी येऊन जातो आणि तेही आठवड्यातून दोनदा? इतर वेळी लोकांनी आजारी पडू नये असा नियम आहे का...?'' कोर्टात हशा पिकला. नंतर त्या डॉक्टरची साक्ष झाली. त्याचे जेसीची रोगचिकित्सा, औषधाची जाण, शुश्रुषा या सर्व गोष्टींचे कौतुक केले. त्यानंतर पोलीस इन्स्पेक्टर रॉजरची साक्ष झाली. त्याने सांगितले की इंटर स्टेट हायवेवर ॲक्सिडेंट झाला की तो जेसीला नेहमी बोलवत असे. कारण या गावाच्या पंचक्रोशीत एकही

डॉक्टर नाही. तिने दिलेल्या फर्स्ट एडचा चांगला उपयोग होई. ''त्याने परवाच्या केसबद्दल हॉस्पिटलच्या डॉक्टरांना विचारा'' असे सांगितले... हॉस्पिटलच्या डॉक्टरांना बोलावले व ते म्हणाले, ''...ज्या तऱ्हेने जखम बांधून रक्तस्राव थांबवला गेला होता ते पाहून मला वाटले एखाद्या कुशल डॉक्टरनेच फर्स्ट एड दिली असावी... तज्ज्ञ व ज्युरीनी दुसऱ्या दिवशी निकाल द्यायचे जाहीर केले.

दुसऱ्या दिवशी डेव्हिड व सॅम शहरात जायला निघाले. बघतात तर काय त्यांच्यामागे गावातले सर्व लोक मुलाबाळांसकट आपापल्या ट्रक, ट्रॅक्टरवर स्वार होऊन शहरात जायला तयार झाले होते. ही सर्व वरात कोर्टात पोचली. कोर्टाचे आवार ट्रक, ट्रॅक्टरने भरून गेले. आत गाववाल्यांची गर्दी! एक वेगळीच धमाल परिस्थिती तिथे दिसत होती. जज्ज व ज्युरी स्थानापन्न झाले. ज्युरींना दोन्ही वकिलांनी केस समजाऊन दिली. सरकारी वकील म्हणाले, ''...जेसीला औषधोपचाराचे ज्ञान असणे शक्य नाही. तिच्याकडे साधी नर्सिंगचीही पदवी नाही...'' त्याबरोबर लोकांनी त्याची हुर्या केली. जेसीच्या वकिलाने कबूल केले की... जेसीकडे कोणतीही मेडिकलची पदवी नाही, पण तिने अनुभवाच्या शाळेत सर्व ज्ञान प्राप्त केले आहे. आताच सर्जन राड्रिग्ज यांनी तिच्या फर्स्ट एडचे कौतुक केले. मी या गावातल्या तिच्या पेशंटना विचारतो की ''आतापर्यंत तिने दिलेल्या औषधामुळे कोणाकोणाचे नुकसान झाले आहे...'' एकेकजण उठून जेसी कशी चांगली आहे व कोणाच्या बाळाला, कोणाच्या बायकोला तर कोणाच्या म्हाताऱ्याला तिच्या औषधाने कसे बरे वाटले याचे अगणित किस्से सांगत राहिले. शेवटी दंडा आपटून जज्ज साहेबांनी सर्वांना शांत राहायला सांगितले. ज्या माणसाने जेसीबद्दल तक्रार केली होती त्याची साक्ष झाली. त्याने सांगितले हिने माझा ताप न बघता मला गोळ्या दिल्या. त्यावर जेसी म्हणाली मी याला काय होते आहे याची लक्षणे विचारली. याने फ्लूची सारी लक्षणे सांगितली. त्याचे अंग तापलेले व लाल दिसत होते. हा खोटे बोलला म्हणून त्याला चुकीचे औषध दिले गेले. मी हे काम सेवा म्हणून करते. यासाठी मी लोकांकडून पैसे घेत नाही. ते जे प्रेमापोटी देतात ते मला नाकारता येत नाही. माझ्या नवऱ्याचे गॅरेज आहे व तो आमच्या संसाराचा खर्च चालवण्यास समर्थ आहे. हा वसा मला आईने दिला व तो मी मरेपर्यंत चालवणार. लोकांनी आनंदाने टाळ्या वाजवल्या... जल्लोष केला. जज्ज साहेबांनी सर्वांना बाहेर जायला सांगितले. कारण त्यानी कोर्टाची शांतता भंग केली होती. ते सर्व गावकरी

कोर्टाबाहेर गर्दी करून उभे राहिले. ज्युरी निर्णय घ्यायला आतल्या दालनात गेले. अर्ध्या तासाने बाहेर येऊन ज्युरीने निर्णय जाहीर केला. त्यांनी सांगितले... जेसी निर्दोष आहे. एका दूरवरच्या खेड्यात केवळ जेसीमुळे लोकांना वेळेवर औषधोपचार होऊन गावाचे आरोग्य राखले गेले. सरकारने गावाच्या आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. तिथे पूर्णवेळ डॉक्टर नेमावा तसेच जेसीला नर्सिंगचे पूर्ण शिक्षण घेण्यासाठी योग्य शिष्यवृत्ती द्यावी त्यायोगे ती हे समाजसेवेचे काम अधिक जोमाने व सक्षमतेने करील... लोकांनी निकाल ऐकला. ज्यूरींचा व जेसीचा जयजयकार केला. जेसीची तक्रार करणाऱ्या त्या पाव्हण्याला तोंड लपवून जीव वाचवत पळून जावे लागले.

वाजत गाजत जेसी गावात आली. लोक खूश झाले. रात्री झोपताना डेव्हिड म्हणाला, ''सॉरी डिअर आता यापुढे मी कधीच तुला या कामाला मनाई करणार नाही. उलट मदतच करीन.''

''अरे मला मदत करण्यापेक्षा तू गॅरेजमध्येच जास्त कष्ट कर. आता सॅमचा शिक्षणाचा खर्च वाढणार. आता मला नर्सिंगचा कोर्स करायला शिष्यवृत्ती मिळणार! माझी फार दिवसाची इच्छा पूर्ण होणार! म्हणजे हे झाले हे बऱ्याकरता असेच म्हणायचे. तो बिचारा मला नेस्तनाबूत करायला आला होता. त्यालाच पळता भुई थोडी झाली.''

''हो आणि माझी ही सोनपरी आगीत तापून सुलाखून अधिकच उजळून निघाली'' असे म्हणून डेव्हिडने जेसीला प्रेमाने जवळ ओढले.

*(ललना दिवाळी अंक, २००५)*